प्रेस रिलिज

प्रेस रिलेशन डिव्हीजन, सेंट्रल ऑफिस, पो.ऑ.बॉक्स ४०६, मुंबई ४००००१
फोन नं.२२६६०५०२, फॅक्स २२६६०३५८, २२७०३२७९

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया**
www.rbi.org.in
www.rbi.org.in\hindi
e-mail: helpprd@rbi.org.in

मार्च ६, २००६

# रिझर्व्ह बँकेच्या नविन धोरणानुसार व्यक्तिगत कारणांसाठी नागरिकांना विदेशी चलन उपलब्ध होण्याचा मार्ग सुकर

रिझर्व्ह बँकेने आज जाहीर केलेल्या धोरणानुसार नागरिकांना व्यक्तिगत कारणांसाठी परकिय चलन उपलब्ध होणार आहे. बँकेच्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे, ठराविक फुल्ल फ्लेज मनी चेंजर्स, कोऑपरेटिव्ह बँका व प्रादेशिक ग्रामीण बँकांना आता, आपल्या व्यावसायिक कारणांव्यतिरिक्तच्या करंट अकौंट धारकांबरोबर विविध प्रकारच्या परकीय चलनांसाठीचे व्यवहार करता येतील.

परकिय चलन विनिमयात खुलेपणा आणण्याच्या धोरणामुळे सर्वसामान्यांना रिझर्व्ह बँकेकडे न जाता, अ व्यावसायिक करंट खात्याच्या माध्यमातून विविध कारणांसाठी परकीय चलनाचा वापर करता येईल. परदेश सहल, परदेशी वैद्यकिय उपचार, परदेशात शिक्षण या आणि सर्वसाधारणपणे अशा अनेक अव्यावसायीक करणांसाठी, आतापर्यंत केवळ अधिकृत व्यावयायीकांकडूनच परकिय चलन मिळविता येत होते. रिझर्व्ह बँकेने आता, फुल्ल फ्लेज मनी चेंजर्स, ठराविक कोऑपरेटिव्ह बँका व प्रादेशिक ग्रामीण बँकांनाहि या व अशा कारणांसाठी  परकीय चलनाचे व्यवहार करण्यास परवानगी दिल्याने, नागरिकांना या कारणांसाठी परकीय चलन मिळविण्याचे अनेक मार्ग खुले झाले आहेत.

अधिकृत व्यावसायीक वर्ग दोन मधील संस्थांना खाजगी परदेश दौरे, व्यावसायीक प्रवास, जागतिक बैठकांमध्ये सहभाग व खास प्रशिक्षण याचबरोबर आंतरराष्ट्रीय घटना/ स्पर्धा (ज्यामध्ये प्रशिक्षण, प्रायोजकत्व आणि बक्षिसांचा अंतर्भाव आहे) चित्रपट चित्रण, परदेशी वैद्यकिय उपचार, परदेशात शिक्षण याबरोबरच परदेशी विद्यापीठाशी असलेल्या करारांतर्गत परदेशातील शिक्षण प्रकरणी सुट, भारतात किंवा परदेशातील परिक्षा शुल्क व जीआई ,टोफेल आदींच्या स्कोअर शिट्ससाठीच्या खर्चात सुट, नोकरी आणि प्रक्रिया खर्च, परदेशातील अर्जांची छाननीच्या शुल्क, स्थलांतर किंवा स्थलांतरासाठी मार्गदर्शनाचे शुल्क, स्थलांतर करण्यास इच्छुक असलेल्यांच्या कागदपत्रांच्या पुर्ततेची तपासणी फी, व्हीसा फी, आंतरराष्ट्रीय संघटनांची नोंदणी/देणगी/सभासद फी यासाठी परकीय चलन पुरविता येईल.

सर्वसामान्यांना परकीय चलन सहजतेने उपलब्ध होईल आणि स्पर्धा वाढल्याने, ग्राहक सेवेचा दर्जा अधिक चांगला होईल या अपेक्षेने रिझर्व्ह बँकेने, परकीय चलन व्यवहारांमध्ये परवानगी असलेल्या अधिकृत सदस्यांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

आपणास स्मरत असेलच की, रिझर्व्ह बँकेने खुल्या आणि अधिकृत व्यक्तींच्या अंतर्गत गटाची, संबंधित विषयांचा अभ्यास करुन सुचना सादर करण्यासाठी स्थापना केली होती. या गटाने केलेल्या सुचना आरबीआयच्या वेबसाईटवर प्रतिसादासाठी उपलब्ध आहेत. या अंतर्गत गटाने केलेल्या सुचनांवरील प्रतिसाद विचारात घेऊन मोठ्या प्रमाणावर लोकांनी करंट अकौंटच्या माध्यमातून परकीय चलन व्यवहार करावेत या उद्देशाने हे परिपत्रक काढले आहे.

ए. पी. (डीआयआर सिरीज) सर्क्युलर नं. २५ दिनांक ६ मार्च २००६ हे या विषयावरील परिपत्रक आरबीआयच्या (http://www.rbi.org.in). वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**अल्पना किल्लावाला**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस रिलिज : २००५-२००६/११२४**